# प्रकरण दुसरे
# 'गौरी देशपांडे यांचे साहित्य'

# प्रकरण दुसरे

## गौरी देशपांडे यांचे साहित्य

### १) लेखिकेच्या साहित्याचा परिचय :-

विसावे शतक हे तसे सर्वच बाबतीत प्रबोधनाचे मानले जाते. या शतकाच्या शेवटच्या दोनेक दशकात तर समाजप्रबोधनाची चळवळ अधिकच दमदार झाली. या दशकात अनेकांच्या लेखणीला धार आली होती. प्रबोधनाने समाजातील तळागाळातील लोक पेटून उठले होते. प्रत्येकाला आपल्या अस्तित्वाची जाणीव झाली होती व आपले समाजात असणारे स्थान ओळखून त्याची जाणीव तो एकदुसऱ्याला करुन देण्यासाठीच जणू लेखणी चालवीत होता.

या दशकात प्रत्येकाला स्वत:ची वेगळी ओळख पटली होती. तसेच स्त्रीलाही तिच्या स्थानाची, अस्तित्वाची ओळख पटली होती. अनंतकाळापासून चुलीत फुंकर मारणे व मुलांचे संगोपन करणे एवढ्याच विश्वात ती गटांगळ्या खात होती. समाजातील इतर घडामोडी बदलणारे जग याच्याशी तिचा काहीच संबंध असू नये का ? असे अनेक प्रश्न ती स्वत:ला विचारु लागली. या शतकात 'स्त्री' ने आजूबाजूला नजर वळवली. सर्वत्र पसरलेला प्रकाश पाहून तिला तिच्या विश्वातील अंधाराची समज आली. ती माणूस आहे. समाजातील एक महत्वाचा घटक आहे. कुटुंबात, समाजात मलाही स्वत:च्या अस्तित्वाची ओळख असावी. माझ्या शिवाय कुटुंब, समाज अपूर्ण आहे. एवढे सारे असताना मला अशी हीनतेची वागणूक का ? मी अशी लाचार, दीन, असहाय्य अबला का ? का माझे जन्मापासून ते शेवटपर्यंतचे निर्णय मी सोडून इतरांनी घ्यावे ? माझ्या सबंध आयुष्यातील कोणत्याच घटनेवर नव्हे घटकेवर माझा काहीच अधिकार असू नये ? हे सारे असेच जर असेल तर मी माणूस आहे का ? असे अनेक प्रश्न व विचारांचे वादळ तिच्या डोक्यात उठू लागले. तेव्हा तिच्या विचारांचा, प्रगल्भतेचा परिघ रुंदावला. उंबरठ्याबाहेर पाऊल पडताच तिने मोकळ्या हवेत स्वत:तील घुसमट टाकून दिली. दशदिशा तिला खुणवू लागल्या.

याच शतकात अनेक पुरुष विचारवंतानाही 'स्त्री' शक्तीची ओळख पटली होती. समाजाला परिवर्तन हवे असेल तर समाजाचा महत्वाचा घटक असणारी 'स्त्री' ही सर्व बाजूंनी पूर्ण असली पाहिजे. तिने ही शिक्षण घेतले पाहिजे. तिला तिच्यातील उणीवा किंवा जाणीवा समजून येण्यासाठी किंवा सांगण्यासाठी स्वत: सक्षम असले पाहिजे. तिच्यात बदलत्या समाजाला स्वीकारण्याची व समाज बदलण्यासाठी लागणाऱ्या विचारांची क्षमता आहे व ती असायला हवी. पुरूष एकटा शिकून समाजात हवे

ते हवे तसे बदल होणे शक्य नाही. त्यासाठी स्त्री शिक्षण देणे किंवा तिला माणूस म्हणून हक्क, अधिकार देणे गरजेचे वाटू लागले.

स्त्री लेखनाचा, स्वतंत्रपणे तिने तिचे भावविश्व शब्दात निर्मिण्याचा आपल्याकडे वारसा आहेच. पण त्यावेळीही तेवढेच, तेवढ्यापुरतेच तिने एक वलय निर्माण केल्याचे दिसते. मधल्या काही काळत स्त्री ही स्वत:तील क्षमतेची, विचारवैभवाची जाणीव विसरुन गेल्यासारखी दिसते.

शिक्षणाने, बदललेल्या समाजाने तिच्यात आत्मविश्वास निर्माण झाला. मी माझी कहाणी शब्दात रुपांतरीत करु शकते ही अस्मितेची ठिणगी तिच्यात फुलली. समाजात मला, माझ्या विचारांना, माझ्यावरील अन्यायाला किंवा मला ज्या प्रसंगांना सामोरे जावे लागते त्याला स्थान असावे असे तिला वाटू लागले. जुनेच प्रश्न, विचार, जुन्याच यातना ती नव्याने मांडू लागली. यातून तिने स्वत:चे माणूसपण जपण्याचा पायंडा घातला. लेखनाची नवी वाट तिने तयार केली.

स्त्री लिहू लागली. आपल्या व्यथा, वेदना व्यक्त करण्यासाठी तिला विस्तारित अवकाश मिळाले. पण तिच्या विचारक्षमतेचे अवकाश मर्यादितच होते. काही काळ स्त्री कुटुंबातच घोटाळत राहिली. फार तर आपल्या आजूबाजूचा थोडासा परिसर ती पाहू लागली.

समाजात घडणाऱ्या घटना, उलथापालथी यांचा वेध ती घेऊ लागली. रूढी, परंपरा, धर्मभोळेपणा यामुळे होणारे स्त्रीचे शोषण तिला सतावू लागले. ती स्वत:कडे, स्वत:च्या कुटुंबाकडे बघता बघता समाजाकडे बघू लागली. समाजातील जातीभेद, विधवा स्त्री तिला आवाज देऊ लागली. आपल्या कुटुंबाशी जसे नाते आहे, तसे समाजात घडणाऱ्या बऱ्या वाईट घटनांशी आपले नाते आहे या विचारांनी तिच्या लेखणीला धार आली. यातूनच 'बळी' सारख्या कादंबरीची निर्मिती झाली. डॉ.सुमती क्षेत्रमाडे, कुसमावती देशपांडे, विभावरी शिरुरकर आदींनी लेखन क्षेत्रात आपले स्वतंत्र अस्तित्व प्रस्थापित केले. यांच्यानंतर अलिकडे गौरी देशपांडे, सानिया, अंबिका सरकार, छाया दातार, प्रिया तेंडुलकर, उर्मिला पवार इ लेखिकांनी आपल्या लेखनात स्त्रीत्वाचा विचार मांडलेला दिसतो. त्या काळात स्त्रीच्या वेदना, व्यथा वेगळ्या होत्या. आज ती मुक्ततेसाठी आर्त पुकारते आहे. काही अंशी ती मुक्त झाल्यासारखी वाटते आहे. पण जरी समाजात बदल झाले असले तरी आजही स्त्री मोकळा श्वास निर्भयपणे घेऊ शकते का ? आजही तिच्या वेदना कायम आहेत. फक्त त्याचे स्वरुप बदललेले आहे एवढेच. असे अनेक विषय या नव्या विचारांच्या लेखिकांनी प्रकाशात आणले आहेत. स्त्रीचे समाजातील

स्थान, तिचे महत्व याची चाहूल प्रत्येकाला लागलेली आहे. तरीही आजही जे तिचेच असून ते मिळवण्यासाठी तिला झगडावे लागत आहे. याचे चित्रण अनेक लेखिकांनी मांडले. ज्या क्षेत्रात ती पदार्पण करते, तिथे ती निष्ठेने काम करते. आज जवळजवळ सर्व क्षेत्रात तिचे दमदार पदार्पण झाले आहे. तिच्या ठायी असणाऱ्या क्षमतेची साक्ष तिने पटवली आहे. साहित्य क्षेत्रातही स्त्रीने सडेतोडपणे अनेक प्रश्नांना वाचा फोडली आहे. या बाबतीत अग्रगण्य नाव म्हणजे गौरी देशपांडे. त्यांच्या मते स्त्री तिच्या संपूर्ण स्वातंत्र्यासाठी, सन्मानासाठी स्वत: लढा देऊ शकते. मुक्त, आत्मनिर्भर, अशा स्त्रीला जीवनात येणारे पेचप्रसंग त्यांना सामोरे जाताना स्त्रीला झालेल्या जाणीवा त्यांच्या साहित्यात येतात. पुरुष जसा स्वतंत्र व्यक्ती आहे. तशीच स्त्री ही स्वतंत्र व्यक्ती आहे. समाजातील हे दोन वेगळे घटक स्वतंत्र आहेत असा त्यांचा मानस आहे. त्यांच्या साहित्यामध्ये स्त्री असो वा पुरुष दोघांच्याही स्वतंत्र जपणुकीचे मूल्य त्या विशद करतात.

कलावंत ज्या मातीत जन्मतो, त्या मातीचा गंध त्याच्या नसानसांत भरुन उरलेला असतो. त्या मातीशी त्याचे नाते अतूट असते. त्या वातावरणाशी, परिसराशी तो निष्ठ असतो. गौरी ताईंना तर स्वतंत्र साहित्य, स्त्री यांचे प्रश्न याचे बाळकडून घरातूनच मिळाले होते. तीन पिढ्यांचा भक्कम वारसा त्यांना मिळाला होता. त्यामुळेच की काय लहानपणापासूनच त्यांचे स्वत:चे स्वतंत्र विचार उदयास आले. ते त्यांच्या साहित्यातून दिसू लागले.

म. धोंडो केशव कर्वे हे त्यांचे आजोबा. स्त्रीविषयी विचार करणाऱ्या तिसऱ्या पिढीत दिनकर कर्वे व इरावती कर्वे यांच्या पोटी गौरी ताईंनी जन्म घेतला. जन्मापासूनच साहित्याची परंपरा त्यांना मिळाली. बालपणापासून जीवनाकडे बघण्याची प्रगल्भता त्यांनी अनुभवली. व्यक्ती स्वातंत्र्याच्या विचाराची पेरणी त्यांच्या बालमनावर झाली. असे असले तरी विवाहाविषयी, पती–पत्नी नात्यासंबंधी त्यांच्या घरातही संपूर्ण एकवाक्यता दिसतेच असे नाही. आजोबा महर्षी कर्वे यांनी विधवांचा, एकाकी जगताना त्यांना होणाऱ्या त्रासाचा गहन विचार केला. नियतीने जोडीदार घालवला. पण त्यात तिचा काय दोष ? तिच्या नसणाऱ्या चुकीची तिला का शिक्षा ? तिच्या आयुष्याचा विचार कोणीही करीत नाही. उलट अनेकजण तिला त्रास देण्यातच वाटेकरी होतात. अशा वेळी सगेसोयरे सारे दूर राहतात. अशा वेळी तिने दुसरा विवाह करुन आपले जीवन सुखकर केले तर कोणाचे काय बिघडावे ? दुसरे असे की, पत्नी गेल्यावर कोणता पती एकट्याने राहतो ? मग ही वेळ स्त्रीवरच का ? अशा अनेक गोष्टींचा उलगडा महर्षी करतात.

विवाहामुळे स्त्रीला संरक्षण मिळते. ती काही अंशी का होईना सुस्थितीत राहू शकते अशी एक बाजू ते मांडतात. तर र. धो. कर्वे यांनी दूरच्या बाजूने स्त्री–विवाह, पती–पत्नी नाते यांचा विचार केलेला दिसतो. विवाह ही गोष्ट स्त्रीला बंधनात अडकवणारी आहे. तिला दु:खी करणारी, तिच्या स्वातंत्र्याच्या आड येणारी गोष्ट आहे, असे त्यांचे मत होते. या उलट विवाह संस्थेवर भरवसा ठेवून योग्य वयात मुलींची लग्ने होणे गरजेचे आहे. असे मानणाऱ्या इरावती कर्वे. अशा तीन लोकांच्या तीन विचार प्रवाह त्यांच्या घरात वहात होते. असे सारे वातावरण असताना गौरी ताईंनी स्वत:चे स्वतंत्र विचार रुजवले. वयाच्या अठराव्या वर्षी गौरी ताई अविनाश देशपांडे नावाच्या व्यक्तीच्या प्रेमात पडल्या. वैदिक पध्दतीने त्यांचा विवाह झाला. लग्नानंतर मात्र तिथे त्यांचा कोंडमारा होऊ लागला. एकप्रकारची घुसमट त्यांना जाणवू लागली. लहानपणापासूनच स्वतंत्र विचाराच्या गौरीताईना जीवनाची ही घालमेल सतावू लागली. स्वत:ला स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व असलेच पाहिजे हे बाळकडू प्यायलेल्या गौरीताईंना असा मनाचा कोंडमारा करुन आयुष्य कंठणे अशक्य झाले. त्या अल्पावधीतच पतीपासून विभक्त झाल्या. नंतर त्यांना सुरिंदर नावाचे गृहस्थ भेटले. त्या दोघांनी मात्र मनांनी एकमेकांचा स्वीकार केला. परस्परांच्या अस्तित्वाची जाणीव ठेवत त्यांच्या आयुष्याचे सूर जुळले गेले. अनेकांनी त्यांच्या एकत्र राहण्याबाबत साशंकता दर्शविली. विवाह झाला किंवा नाही याविषयी चौकशी केली. पण त्या चौकस समाजाचे गौरीताईंना सोयरेसुतक नव्हते. एकत्र राहण्यासाठी विवाहाचे बंधन बांधलेच पाहिजे. यावर त्यांचा विश्वास नाही.

ज्या वातावरणात साहित्यिक वावरतो. तेथील वातावरणाशी त्याचे नाते जुळले जाते. ते वातावरण, तेथील अनुभव हेच त्याचे मनोविश्व असते. तेच त्याच्या साहित्यातून दिसते. गौरीताईंच्या साहित्यात सततच्या परदेश दौऱ्यांचा प्रभाव आहे. उच्चभ्रू लोक, परदेशी श्रीमंती त्यांनी जवळून पाहिली. तेच त्यांच्या लेखनातून प्रगटले. झोपडपट्टीतले, दुबळे, गरीब लोक त्यांच्या लेखनात दिसत नाहीत. ते त्यांना उसने आणावे लागले असते. त्यात जिवंतपणाचा आभास जाणवला असता. गौरी देशपांडे यांच्या साहित्यात त्यांनी अनुभवलेले, पाहिलेले वर्णन येते. त्यांचे लेखन आत्मभान बाळगणाऱ्या, स्वतंत्र अस्तित्व असणाऱ्या, लोकांविषयी असते. म्हणजेच त्यांचे लेखन समूहनिष्ठतेपेक्षा व्यक्तीनिष्ठतेकडे झुकते. समाजाचा एकत्रितपणे विचार करताना त्या दिसत नाहीत. कारण समाजातील प्रत्येक व्यक्ती वेगळी असते. 'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती' या प्रमाणे प्रत्येक व्यक्तीप्रमाणे त्याचे वलय वेगळे असते. एकाने दुसऱ्या सारखे तंतोतंत राहण्याचा किंवा जगण्याचा प्रयत्न करणेपेक्षा प्रत्येकाने

स्वतंत्र आपले अस्तित्व जपावे. याकडे त्यांचा ओढा दिसतो. प्रत्येकाच्या विचारांची कुवत, त्यांच्या जाणीवा, उणीवा, संवेदना सर्व काही निराळे असते. मग समूहाचा विचार येतो कुठे? उदा. गौरी देशपांडे यांच्या 'एकेक पान गळावया' या कथेतील राधा. तिला मनासारखा नवरा असतो. मुलं असतात. सारं काही हवं तसं असतं. शिवाय देश-विदेशात भटकायलाही मिळत असतं. तरीही ती कोणत्या तरी मानसिक तणावाखाली असल्यासारखी वाटते. याच परिस्थितीत जगणारी दुसरी एखादी स्त्री हा ताण अनुभवत असेलच असे नाही. म्हणजे प्रत्येकाचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो.

'आता कुठं जाशील टोळभट्टा' या कथेतील नवविवाहीत स्त्री. हनीमूनसाठी बाहेर गेलेले जोडपं. त्यातील नववधू, एखादं पुस्तक वाचायला आणायला हवं होतं. असं सहजगत्या आपली इच्छा बोलून दाखवते. तेव्हा ते नवऱ्याला खटकतं. त्याला ते आवडत नाही. कारण पत्नीने तिचा सारा वेळ पतीसाठीच दिला पाहिजे. मग तिची इच्छा असो किंवा नसो. तो समोर आहे तोपर्यंत तिने इतर कोणत्याही बाबींकडे लक्ष द्यायचे नाही. जणू तिचा वेळच नव्हे संबंध आयुष्यच केवळ आणि केवळ त्याच्याच सुखाचा विचार करण्यासाठी घालवला पाहिजे. अनेक वर्षे पुरुषाची ही सवय स्त्री पूर्ण करत आली आहे. तिने तिचे अस्तित्व त्याच्यात पूर्णत: विलीन करुन टाकले आहे. आपण स्वत:चा स्वत: वेगळा विचार करु शकतो हे जणू ती विसरुन गेली आहे. असे वाटण्याइतके स्त्रीने स्वत:ला पुरुषामध्ये एकवटून टाकले आहे.

पण गौरी देशपांडे यांच्या साहित्यात वावरणाऱ्या स्त्रिया स्वत:विषयी पूर्ण जाग आलेल्या दिसतात. स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व जपणाऱ्या असतात. मी स्त्री आहे, पण प्रथम मी माणूस आहे. माणसाला लागू असणारे सर्व हक्क, विषय, हे दोघांना निराळे असता कामा नये असा स्पष्ट विचार मांडणाऱ्या आहेत.

स्त्री-पुरुष यांचे नाते फक्त पती-पत्नी एवढे मर्यादित का असावे ? पुरुष-पुरुष, किंवा स्त्रीशी स्त्रीचे असणारे नाते अनेक पदरी असते. ते दोघे परस्परांशी मित्रवत मोकळेपणाने वागू, बोलू शकतात. मग पुरुष व स्त्री हे दोघे एकमेकांशी मोकळेपणे का राहू शकत नाहीत ? असा त्यांच्या नायिकांचा दावा असतो. 'आता कुठे जाशील टोळभट्टा' मधील विवाहिता दुसऱ्या पुरुषाच्या प्रेमात पडते. पण हे चूक की बरोबर असा विचार करीत नाही. उलट माझ्या भावमधुर, हळव्या भावनाशी नवऱ्याचा काही संबंध नाही. त्या भावना माझ्या स्वतंत्र मनात उमटलेले भावतरंग आहेत असे ती समजते.

एकूणच काय तर या नायिकांना ना कोणाशी बंड करायचे असते, ना कोणाशी प्रतारणा किंवा स्वत:च्या विचारांचा त्यांना खोटा दंभ ही नसतो किंवा न्यूनगंड किंवा अपराधीपणाचा भाव ही नसतो. असते केवळ स्वत:च्या मताशी, मनाशी, विचारांशी प्रामाणिकपणा.

अगदी अलीकडच्या लेखिका म्हणून गौरी ताईंचे साहित्य एक वेगळी वाट निर्माण करते. साहित्य क्षेत्रात नवनवीन प्रवाह निर्माण होत असतात. कोणत्या तरी वळणावर एकदा प्रवाह नव्याने येऊन मिळतो. तो आपला स्वतंत्रपणा दर्शवत असतो. तसे इतर लेखिकांनी किंवा पुरुष वर्गानेही स्त्री विषयी, तिच्या समता, स्वातंत्र्य, तिच्या गरजा, जाणीवा याबद्दल मुक्त हस्ताने लिहिलेले दिसते. तरीही या सर्वांहून अगदी निराळे वाटावे. आपल्या निराळेपणाचा ठसा जणू वाचक मनावर उमटवणारे असे गौरी ताईंचे साहित्य वाटते. जास्तीत जास्त परदेशी दौऱ्यामुळे तेथील वातावरणांचा त्यांच्या मनावर झालेला परिणाम असावा असे वाटते. प्रगल्भ आणि मुक्त विचारसरणीच्या या लेखिकेचे लेखनही त्याच स्वरूपाचे आहे. साहजिक त्यांच्या साहित्यातील स्त्रिया कोंडमारा सहन करणाऱ्या किंवा मनाविरुध्द इतरांच्या विचारांना बळी पडणाऱ्या नाहीत. स्त्री–पुरुष नात्याचा पती–पत्नीशिवाय इतर दृष्टीने विचार करणाऱ्या दिसतात. पुरुष तसा स्वतंत्रपणे आपले मत मांडतो किंवा इतरांचे मत स्वत:वर लादून घेईलच असेही नसते. तो परस्त्रीशी उघड संबंध ठेवू शकतो. म्हणजे आपल्या भावनांना उघडपणे दाद देऊ शकतो. पण स्त्री मात्र यापैकी काहीही करु शकत नाही. दावणीला बांधलेल्या जनावरांप्रमाणे तिचे सारे भाव–बंध इतरांच्या हातात असतात. उघडपणे ती कुणा पुरुषांशी नव्हे अगदी नवऱ्याच्या मित्रांशीही बोलू शकत नाही. एखादी स्त्री विवाहबाह्य संबंधातून गरोदर राहिलीच तर समाज तिचा धिक्कार करतो. उलट तिच्या त्या अवस्थेसाठी कारण असणारा पुरुष मात्र करुन सवरुन 'तो मी नव्हेच' अशा प्रकारे वावरत असतो. गौरी देशपांडे यांच्या साहित्याचे हेच वैशिष्ट्य आहे. येथेच त्यांचे साहित्य नवीन वाट चोखाळते. समाजमान्य चाकोरी सोडून स्वतंत्र विचार करते. म्हणून गौरीताईंच्या नायिकामध्ये स्वयंभू मुक्तपणा जाणवतो. त्या तो ओढून ताणून आणीत नाहीत किंवा स्वत:वर लादूनही घेत नाही. मी माझ्या मनाला जे आवडेल, त्याच्या स्वीकार करणार या बाण्याची आहे आणि म्हणूनच या नायिकांचे विवाहबाह्य संबंध आहेत. ते तिच्या स्वतंत्र मनाने स्वीकारलेले आहेत. ते कोणत्या गरजेसाठी किंवा अगतिकतेतून आलेले दिसत नाहीत. स्वत:शी, स्वत:च्या मताशी निभावलेला, जपलेला प्रामाणिकपणा, येथे समाजाच्या नीती, अनिती किंवा बांधिलकीचा संबंध त्यांना मान्य नाही .

म्हणूनच 'कारावासातून पत्रे' मधील देवी, 'व्यक्ती' म्हणून जगते तेव्हा आपल्यावर सत्ता गाजवू पाहणाऱ्या पुरुषाला त्याची जागा दाखवून देते. शारीरिक गरजांना 'प्रेम' नाव देऊन दोघेही परस्परांशी

प्रतारणा करीत असतात. या कथेत स्त्री पुरुष यांच्या नात्यातील मानसिक, भावनिक संघर्ष व्यक्त होतो. 'एकेक पान गळावया' मध्ये एका घरामध्ये राहणारे पती-पत्नी आणि मुलं यांच्याकडे विशिष्ठ नात्याच्या चौकटीतून पाहू नये, तर त्यांच्याकडे स्वतंत्र व्यक्ती म्हणून पहावे असा नवा दृष्टिकोन गौरी देशपांडे व्यक्त करतात.

दोन व्यक्तीमधील शारीरिक व मानसिक संबंधांशी थेट भिडण्यामुळे त्यांना त्यातील निखळतेचे दर्शन घडते. म्हणूनच की काय स्त्रीच्या भावविश्वातील हळवेपणा किंवा आक्रमकताही त्यांच्या दृष्टीस येत नाही. या पार्श्वभूमीवर 'काही दूरपर्यंत' मधील जसिकाला येणारे अनुभव त्यांनी स्वच्छपणे मांडले आहेत. स्त्री पुरुष नात्यातील कोंडमारा अनुभवण्यापेक्षा नितळता त्या स्पष्ट बघतात. मुक्तपणे स्वतंत्र विचाराने जगणे मान्य असणाऱ्या या नायिका विवाह संस्थेच्या कचाट्यातून मुक्त होऊन आणखी मोठ्या स्वातंत्र्याची मागणी करणाऱ्या आहेत. लग्न संस्थेसंबंधी बंडखोर भूमिका त्यांनी घेतलेली आहे. लग्नसंस्थेतून येणारी नात्याची सर्व बंधने त्या झुगारु पाहतात. त्यांनी चित्रण केलेली स्त्री तिच्या इच्छा - अपेक्षेने जगणे मान्य करते. त्यामुळेच ती नीती अनीतीच्या कल्पना, समाज भय यापासून लांब राहते.

गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील जवळ जवळ प्रत्येक नायिका विवाहबाह्य संबंध मान्य असणारी आहे. स्वत:च्या जीवनाकडे स्वत:च्या मन:चक्षूनी पहाणारी आहे. स्वत:चे निर्णय स्वत:च्या मनोभावनांना साक्षी ठेवून घेणारी आहे. त्यांच्या कादंबरीतून लेखिका नायक किंवा नायिकेच्या मनातील मुक्तता स्पष्ट करते त्यातील स्वगते उत्कटता साधतात. त्यांच्या साहित्यातील निवेदक अंतर्मनाचे व्यवहार व्यक्त करतात. उदा. 'तेरुओ' मध्ये 'जी' ना पत्र लिहिते वेळी नायिका 'तेरुओ' शी असणारे संबंध न कळवता तटस्थ रहाते. पण आपल्या मनातील उत्कट भावनांना या नायिका कोंडून किंवा कोणाच्या दडपणाने, समाजाच्या विचाराने दडपून न टाकता त्यांना मोकळी वाट करुन देतात. त्यामुळे त्या अशा संकुचित किंवा घुसमटलेले जीवन असहाय्यपणे कंटाळवाणे जिणे न जगता सहजतेने जीवनाचा आस्वाद घेताना दिसतात.

पूर्वीच्या काळी स्त्रिया उंबरठा ओलांडून बाहेर जात नसत. घरातच त्यांचे जीवन सुरु होई व तिथेच संपे. बाहेरच्या विश्वाशी त्यांचा संबंध फार कमी येत असे. घर, पती, मुले किंवा फार तर नवऱ्याच्या नात्याने जोडलेली माणसे एवढेच मर्यादीत तिचे विश्व असे. घरातही फार कमी तिला अधिकार असत. अतिशय हीन दर्जाची वागणूक मिळे. तिला पुरुष वर्गात मोकळपणाने वावरणे किंवा स्वत:चे एखादे मत स्पष्ट करणे, तिला अशक्य असे. समाजाची बंधने, नीती-अनीतीच्या दोरीचे फास

तिच्या मनोविश्वाला करकचून आवळलेले होते. आता मात्र त्यात बराच बदल झालेला दिसतो आहे. स्त्री शिकू लागली. तिला बाहेरच्या जगाची ओळख पटू लागली. तिचे वैचारिक विश्व रुंदावू लागले. तिला आत्मभान आले. स्वत:कडे पर्यायाने इतरांकडे पाहण्याची तिची दृष्टी बदलली. पूर्वी मुलगी घराला भार वाटत असे पण हीच मुलगी नोकरी करुन घराचा आधार ठरु लागली. आपल्या बुध्दीची कुवत, विचारांची क्षमता सिध्द करु लागली. नीती-अनितीच्या कल्पनेतून बाहेर पडून वास्तवात पुरुष वर्गाशी विचारांची देवाण-घेवाण करु लागली.

अशा तऱ्हेच्या नीती मूल्यांना आव्हान देणारे अनेक प्रश्न गौरी देशपांडे यांनी आपल्या साहित्यात उपस्थित केले आहेत. जरी स्त्रीकडे बघण्याची समाजाची दृष्टी बदलली असली तरी आजही ती पूर्णतया तिच्या मुक्ततेला, स्वतंत्र विचाराला पोषक आहे असे नाही. तिच्या त्या वेळेच्या वेदना निराळ्या होत्या. पण आजही तिच्या वेदना, अडचणी काही संपलेल्या नाहीत. त्याची दिशा किंवा काळानुसार त्यांची परिस्थिती बदलेली आहे. एवढेच, पण गौरी देशपांडे या साऱ्याच्या पुढे जाऊन अगदी तिच्या अंतर्मनाचा वेध घेतात. तेव्हा तिच्या सुख, दु:ख, संवेदना त्यांना स्पष्ट जाणवतात. त्यांच्या कथानकातील कल्पनारम्यतेचा भाग सोडला तर त्यांनी मांडलेले व्यक्तिस्वातंत्र्याचे विचार, स्त्रियांचे मांडलेले मुक्त विचार यांना वेगळाच दर्जा प्राप्त होतो.

स्त्री लेखनाची परंपरा मोडून १९७५ पासूनच तशी स्त्री स्वत:कडे 'माणूस' या नात्याने पाहू लागली आहे असे दिसते. व तेव्हापासूनच तिच्या लेखनातही स्त्री ही एक माणूस आहे. ती गुलाम नाही असे टाहो फोडून सांगू लागलेली दिसते. त्यापैकी गौरी देशपांडे या स्वतंत्र प्रज्ञेच्या लेखिका आहेत. त्यांनी आपल्या लेखनाचा अगदी वेगळा वाटावा असा ठसा वाचक मनावर उमटवला. वेगळी वाट धुंडाळणाऱ्यांना जो त्रास होतो. तसाच काही अंशी त्यांना ही झाला. पण स्वत:च्या मनाशी प्रामाणिक असणाऱ्या गौरीताईंनी आपल्या लेखनातून स्त्रीचे अस्तित्व इतरांच्या दृष्टीस आणून देण्याचे स्वीकारलेले काम सोडले नाही.

गौरीताई तशा इतर स्त्रियांपेक्षा स्वभावानेही काहीशा निराळ्या वाटतात. त्यांची केशरचना, वेशभूषा ही परंपरेने चालत आलेली, इतर स्त्रियांनी स्वीकारलेली वाटत नाही. पुरुषी स्टाईलचे कमी केस व जीन्स आणि टी शर्ट हा त्यांचा नित्याचा पोषाख . मला जे योग्य वाटते, माझे मन जे करणे योग्य समजते ते मी करते. मग त्यासाठी इतर स्त्री वापरते ती वस्त्रे किंवा केशरचना माझ्या मनाला दडपून दुसऱ्यासाठी किंवा कोणी काय म्हणेल या विचाराने मी का करु ? असे त्यांचे विचार सुचवतात. इतर स्त्रिया समाज भयाने मनात असून सुध्दा कित्येक गोष्टींचा मोह टाळतात. म्हणजे गौरीताईंच्या लेखी त्या

स्वत:च्या मताशी प्रतारणा करत असतात. पुरुष असे करतात का ? बऱ्याच बाबतीत ते स्वत:च्या मनाचाच विचार घेतात. समाज ते चालवून घेतो मग स्त्रीनेच का समाजभय बाळगावे ? असा त्यांचा दावा आहे. दारिद्रय, आर्थिक विवंचना त्यांच्या कादंबरीत नसते. उच्चभ्रू, उच्चशिक्षित व स्वतंत्र विचाराची स्त्री त्या रेखाटतात.

सर्वसामान्य स्त्रीपेक्षा गौरी देशपांडे यांचे व्यक्तिमत्व वेगळे होते. स्वतंत्र विचारसरणी, निर्णयक्षमता आणि मुक्त जीवन शैली ही त्यांच्या व्यक्तिमत्वाची खास वैशिष्ट्ये दिसून येतात. समृध्द विचारविश्व, आर्थिक सुबत्ता, जगप्रवास, निरीक्षण क्षमता, संवेदनशीलता, बंडखोर विचारशैली, पाश्चात्य जीवनसरणीचा प्रभाव, स्त्रीवादाचा स्वत:च्या दृष्टीने अर्थ घेऊन जगलेले जीवन व त्यानुसार निर्माण केलेल्या साहित्यकृतीचे स्वरुप आहे.

जरी त्या स्वभावाने स्वत:च्याच मनाने चालणाऱ्या असल्या तरी एकंदर त्यांच्या स्वभावातील अनेक गुण दिसतात. त्यांना निसर्गाची आवड आहे. तसेच मांजरे, कुत्री अशा प्राण्यांचीही आवड आहे. त्यांच्या साहित्यातून येणारे निसर्ग वर्णन किंवा प्राण्यांविषयी कळकळ त्यांची आवड दर्शविते.

प्रत्येक वेळी स्त्रीने आपल्या हळवेपणाचे, भावुकतेचे दुबळे स्वर गात बसण्यापेक्षा त्यांच्यातले धीटपणासारखे अन्य गुण जोपासताना दिसतात. 'आहे हे असे आहे', या पुस्तकामध्ये फक्त तटस्थता किंवा औपचारिकता नाहीच तर त्यात निरपेक्ष मनाचा प्रामाणिकपणा आहे. असे त्यांचे सरळ, उघडे मन ! त्यात भाबडेपणा, दुबळेपणा, केवळ औपचारिकता नसते. रोखठोकपणा असला तरी तिची निर्भेळ सतेजता जाणवते. त्यामुळेच की काय त्यांच्यासाठी 'गौरी देशपांडे एक उघडं पुस्तक' असा शब्दप्रयोग वापरल्याचे दिसते.

बिहार मधल्या गुलामांना मी गुलाम आहे असे वाटते. मग मला हे सारे अन्याय सहन केलेच पाहिजेत असे वाटत असे. तसे आपल्या स्त्रियांना मी स्त्री आहे मग मला दुय्यम दर्जा असणारच, हे एवढेच माझे काम किंवा बंधने, चाकोऱ्या, नीतीपाठ, नियम हे सारे माझेसाठीच आहे असे वाटत होते. पण ती जेव्हा डोळे उघडते तेव्हा तिला समोर लख्ख प्रकाश दिसण्याऐवजी स्वत:च्या जीवनातील कभिन्न काळोख दिसला. त्या अंध:कारातून ती आजही स्वत:चे असणारे पण झाकले गेलेले अस्तित्व शोधते आहे. त्या शोध मोहिमेतील लेखनातून स्वत:ला भावलेले विचार इतरांना सांगण्याची धडपड करणाऱ्या स्त्रियांपैकी गौरी देशपांडे या अग्रेसर वाटतात. त्या स्त्रीच्या मताविषयी, तिच्या अज्ञानाविषयी बोलताना पुरुषांना मानत नाहीत किंवा त्यांचा तिरस्कार करतात असे दिसत नाही तर स्त्री व पुरुष या दोन जाती

समान आहेत असे मानतात. पुरुष जसा स्वत:च्या भावनेचा, मनाचा प्रामाणिकपणा जपतो तसाच प्रामाणिकपणा स्त्रिया ही जपू शकतात. कारण त्याही माणूसच आहेत. हेच त्यांना सांगायचे आहे.

मुलाला जन्म देणे किंवा स्वयंपाकादी घरकाम करणे ही कामे स्त्रिया करत असल्यामुळे या समाजाने त्या कामांनाच दुय्यम दर्जा देऊन टाकला. कारण स्त्रियांचा दर्जा दुसरा. उलट मुलाला जन्म देणे ही सृजनशक्ती आहे. निसर्गाचे चक्र चालू ठेवण्याचे कार्य करण्यासाठी निसर्गाने मादीला, स्त्रीला निवडले यातील महानता लक्षात न घेता, उलट त्यात लहानता पाहिली. कारण स्त्रीला दुय्यम दर्जा हेच त्यांना सांगायचे आहे असे दिसते. पुरुष पैसा कमावतो, त्याने घर चालते म्हणून तो श्रेष्ठ असेल तर स्त्री ही पैसे कमवू शकते. मग ती कनिष्ठ का ? अशी अनेक कामे स्त्री करु शकते, पण स्त्री करते ती कामे, की ज्यांना पुरुष हलकी समजतात ती पुरुष करु शकत नाहीत आणि त्यामुळेच ते स्त्रियांच्या माथी कनिष्ठता देऊन स्वत:ला श्रेष्ठ समाजात असे त्यांचे मत असल्याचे जाणवते.

व्यक्ती तितके विचार प्रवाह असणार. त्यामुळे त्यांच्या विचारांना सर्वांकडून सारखाच प्रतिसाद मिळालेला जरी दिसत नसला तरी योग्य व स्वच्छ विचार अनेकांना पटतात. अनेकांना सारं कळत असतं पण परंपरेच्या भिंती मोडण्याच्या भयाने लोक सूरातसूर मिसळून जीवन कंठत असतात. पण त्यापैकी गौरीताई नाहीत असे दिसते. त्यांचे विचार हे फक्त त्यांच्या शब्दाभोवती किंवा कागदावरच फिरत राहिले नाहीत तर त्या स्वत: तसे (समाज प्रवाहा विरुध्द म्हटल्यास गैर होणार नाही.) जीवन जगल्या. मी आहे अशी आहे. पटेल तर स्वीकारा अन्यथा तुमची मर्जी. पण मी मात्र माझ्या विचारांशी, स्वमनाशी प्रतारणा करणार नाही. त्या प्रामाणिकपणातच माझे माणूसपण जिवंत ठेवून जगेन, असाच त्यांचा पवित्रा होता. स्त्रिला कोंडून ठेवून, तिच्या बुध्दिची कवाडं बंद ठेवून तिच्या कामाला दुय्यम स्थान देऊन स्वत:कडे श्रेष्ठत्व घेणारा पुरुष श्रेष्ठ कसा ? असा त्यांचा समस्त मानव जातीला रोकडा सवाल आहे.

त्यांच्या अनेक कथांतून मुक्त स्त्री वावरते. स्वत:चे गुण–दोष ती स्वीकारते. त्यांच्या कथेतील स्त्री फक्त स्त्रीत्वाचे भावुक, भाबडे गोडवे गात न बसता. बुध्दीगम्यता व परंपरा भेदकतेचा विचार अवलंबते. १९७५ ते २००० मध्ये लेखन करणाऱ्यांपैकी गौरी देशपांडे या महत्वाच्या लेखिकांमध्ये गणल्या गेल्या त्या त्यांच्या स्वतंत्र, स्वयंभू विचारामुळे. त्यांच्या कादंबऱ्यामधून स्त्री पुरुष संघर्ष आहे तसा स्त्री–स्त्री यांचाही संघर्ष आहे. 'गोफ' मधील सासू सुनेच्या भावनिक,मानसिक विचारांचा सुरेख

शाब्दिक गोफ विणला आहे. सासू-सुनेच्या नात्यातील तेढ जशी आहे तसा त्यांच्यात एकमेकांविषयी आदरही आहे. घटनेपेक्षा मनोव्यापारावर भर देवून त्यांनी गोफ विणला आहे. या गोफ विणीतून त्यांचे लेखन सामर्थ्य प्रतीत होते.

काही वेळा एकमेकींना पुरते किंवा योग्य दिशेने समजून न घेतल्यामुळे मने दूषित होतात. हे त्यांनी 'निरगाठी' मध्ये दाखवले आहे. 'मध्य लटपटीत' यामध्ये त्यांनी लग्नसंस्थेवर प्रकाशझोत टाकला आहे. यातील नायिकेला लग्न करणे, न करणे किंवा पुरुषाबरोबर विवाह विधीचे सोपस्कार न करता राहणे यात निराळे काहीच वाटत नाही. पण लेखिका पूर्ण विवाह संस्थांच नको असेही सांगत नाही. विवाह केल्याने सुखी होणारे किती? असे विचारतात पण कोणीही विवाह करुच नका, असे मत त्या लादत नाहीत. मला तसे माझे मत योग्य वाटते. तसेच इतरांनाही आपल्या मताशी प्रामणिक राहिले तर त्यांना विरोध नाही. पण बिन लग्नाचे राहिल्याने कोणी त्यांना दूषणे द्यावीत हे त्यांना पटत नाही.

तसेच स्त्री-पुरुष संबंधाचे प्रगल्भ चित्र त्या 'मुक्काम' मधून उभे क्ररतात. स्त्रीचे जीवन, विवाह, पती-पत्नी संबंध सारे ओलांडून शेवटी एकत्र येतात.

'एकेक पान गळावया' मधील नायिका ही आपल्या मुलीला स्वतःचे निर्णय तू स्वतः घे. आयुष्य तुझे आहे. तुला ते तुझ्या मताशी निष्ठ राहून जगता आले पाहिजे,असे सांगते, म्हणजे त्यांच्या स्वतःच्या व्यक्तित्वाचा ठसा त्यांच्या प्रत्येक कथा कादंबऱ्यातून उमटल्याचे सतत जाणवते.

'दुस्तर हा घाट' मधील नायिका नवऱ्याच्या दोषाने न खचता, ते स्वीकारते पण त्याचवेळी ती आपली जीवनरित बदलते असे अनेक स्त्री मनाचे हेलकावे, बारकावे, बारकाईने टिपण्याचा प्रयत्न गौरीताईंनी केला आहे. प्रत्येक स्त्रीला त्यांची कथानायिका आपली जवळची वाटते. भपका किंवा वरवरपणा त्यांच्या साहित्यात नाही. तर केवळ निर्मळपणा, शुध्दपणा आहे हे स्पष्ट, स्वच्छ, प्रामाणिक, मोकळे, पारदर्शक आहे. स्वीकारण्याची सक्ती नाही. विरोधाची धास्ती नाही. पोकळ बडबड नाही तर भरीवपणाची भक्कमता आहे. जीवन जगत असताना, परदेश दौरे घडतात तेव्हा समाजातील जवळून पाहिलेले सत्य, मानवी मनाचे त्यातही स्त्रीचे, तिच्या निरागस मनाचे कोंडलेले कंगोरे त्यांनी सर्वांसमोर मांडले आहे. त्यात समाजाचे, परंपरा मोडण्याचे खोटे भय नाही किंवा ओढून आणलेली औपचारिकताही नाही. त्यामुळे त्यांच्या लेखनाला स्त्री मनाचा गंधाळ स्पर्श आहे.

## २) लेखिकेच्या कादंबरी लेखनामागील प्रेरणा, हेतू :-

गौरी देशपांडे यांच्या समग्र साहित्याचे अवलोकन करता त्यांच्या लेखनामागील प्रेरणा, हेतू लक्षात येतो. खरे तर त्यांनीच सांगितले आहे (विंचूर्णीचे बंड मध्ये) माझा पिंड लिखाणातून समाजसुधारणा घडवून आणण्याचा. त्यावरुन असे दिसते की, त्यांचीही ही तिसरी पिढी. महर्षी कर्वे हे त्यांचे आजोबा. त्यांनी आयुष्यभर स्त्रियांसाठी, समाजातील तळागाळातील लोकांसाठी कार्य केले. हे आपले बांधव आहेत, आपल्याला जे समजले आहे, म्हणजे जीवनाकडे बघण्याची जी नवीन दिशा सापडली आहे. त्या दिशेने आपण एकटेच न जाता इतरांनाही घेऊन जावे हा त्यांचा ध्यास आहे. त्या काळात परिस्थिती तर अति बिकट. स्त्री, अस्पृश्य म्हणजे गुलामच. त्यांच्या जीवनात परिवर्तन घडल्याशिवाय समाजाचा विकास होणे नाही हे पटलेले सत्य इतरांच्या गळी उतरवण्यासाठी त्यांनी अखंड धडपड केली.

नंतर वडिलांनीही लेखनातून समाज प्रबोधनाचे विचार पुरवले. त्यांचा भला थोरला वारसा घेऊन जन्मलेला त्यांचा पिंड. त्यांच्या नसानसांत समाज, देश, बदलावा याचे वारे वहात होते. अगदीच त्या इराद्याने किंवा फक्त दुसऱ्याने सुधारावे, काही बोध घ्यावा एवढ्याच भावनेतून त्यांचे लेखन झालेले दिसत नाही. पण स्त्रीने किंवा पुरुषांनी एकमेकांकडे बघताना तसेच स्वत:कडे बघताना कोणत्या दृष्टीने बघावे हे त्यांच्या लेखनातून जाणवते. स्त्री ही सुध्दा व्यक्ती, म्हणजे माणूस आहे, तिने केवळ, नाजूकपणा, हळवेपणा, लाजरे-बुजरेपणा याच भावना जोपासाव्यात अशी अपेक्षा न करता तिला स्वत:च्या बुध्दीचा, विचारांचा, मतांचा वापर, विकास करु द्या. असाच त्यांचा अविर्भाव दिसतो आणि हेच त्यांच्या लेखनाचे हेतू आहेत.

स्त्री स्वत:ला मी सुधारलेली आहे, मी शिकलेली आहे असे एकीकडे म्हणते तसे ती समजतेही. पण वस्तुस्थिती निराळेच सांगते. शिक्षण घेणे, नोकरी करणे म्हणजे ती सुधारली का ? ती मुक्त, स्वतंत्र आहे का? नोकरी करते त्या पगारावर तरी तिचा अधिकार असतो का ? हे पाहण्याची आज गरज आहे. ती शिकली असली तरी कुटुंबात तिच्या विचाराला, मताला किती स्थान आहे ? हे ती बघते का ? असा प्रश्न उभा राहतो. तिने कुठे नोकरी करावी ? इथपासून तिने काय ल्यावे, काय प्यावे हे ही दुसऱ्याचे ऐकून ती ठरवत असते. पण याचे दु:ख वाटण्यापेक्षा गौरीताईंना ते सर्व चालवून घेणाऱ्या, स्वीकारणाऱ्या स्त्रीची खंत वाटते. यातूनच त्यांच्या लेखणीला धार चढते असे जाणवते.

त्यांनी जसे खेड्यातील ग्रामीण जीवन ऐकलेच नाही तर जवळून जगले आहे. तसेच भारताबाहेरचे अनेक देश पाहिले आहेत. त्यामुळे दोन्ही जीवनात जाणवणारी मोठी दरी त्यांच्या नजरेतून सुटत नाही.

14863

आपली स्त्री किंवा माणसे अशी आहेत. त्याला बऱ्याच अंशी ती स्वत:च जबाबदार आहेत असे त्यांचे मत आहे. अनेकांनी जीवनेच्या जीवने खर्च केली पण आम्ही आंधळ्या-बहिऱ्यासारखे. आहे तसेच व आहे तेथेच आहोत. एखाद्यांच एखादं पाऊल पुढे एवढाच बदल. या पोटतिडकीतून त्यांचे लेखन झालेले आहे.

लहानपणापासून खेड्याच्या मातीशी अल्प का होईना नाते होते. पण त्यांचा स्वभावधर्मच असा दिसतो की, जे करायचे, बघायचे, अनुभवायचे ते मनापासून. त्यामुळे आलेला अनुभव त्या शब्दबध्द करतात. वावर, गडीमाणसे, कुत्री-मांजरे, झाडे-पिके हे त्यांच्या परिवारातील एक. इतकी जवळीक. त्यामुळे त्यांचे लेखनही बेगडी न वाटता स्वानुभवाचे, आतून आलेल्या धुमाऱ्या सारखे, सहज सुंदर वाटते. वास्तवतेचा गंध दरवळत राहतो.

तसेच परदेशातील अनुभव मित्र त्यांच्याशी मनमोकळे संबंध त्या निर्भिडपणे, शुध्दतेने मांडतात. वाचकास त्या मित्रच समजत असाव्यात कारण, मी कोणी सुधारणेचा झेंडा घेऊन आलेली सुधारक नाही किंवा बोध देऊन शहापण शिकवणारी बोधवादी नाही. असे त्यांचे विचार आहेत. मित्राला काहीही जीवनातील गोष्टी, अनेक अनुभव, नात्याचे जिव्हाळ्याचे स्नेहसंबंध सांगताना आडपडदा नसतो. कारण तो मित्र असतो. मैत्रीत असते निखळता, निर्भेळता, निरागसता. असे वाटून त्यांनी लेखन केलेले दिसते. मग त्या मित्राने एखाद्या चुकीबद्दल निंदा केली तरी राग नाही किंवा स्तुती केली तरी अहं नाही या भावनेने सारे समोर मांडलेले दिसते.

त्यांचे स्वत:चे आयुष्य, जीवनाचा प्रवास व त्यांचे लेखन यांचा घनिष्ट संबंध असल्याचा पानोपानी प्रत्यय येतो. म्हणजे त्यांचे खायचे व दाखवायचे दात निराळे नाहीत किंवा 'ओठात सोवळे पोटात काळे' असे नाही तर 'आहे हे असे आहे' याच वृत्तीचे त्यांचे लेखन आहे.

लेखनाची प्रेरणा त्यांना त्यांच्या घरातूनच मिळालेली आहे. जन्मापासून मुले जे पहतात त्याचे अनुकरण कोणतेही बालमन करते.

दुसरे म्हणजे त्यांना लेखनाचे सूर त्यांच्या जीवन गाण्यातच सापडलेले दिसतात. माणसाचे जीवन कसे असते हे त्यांनी अनेक जीवनाकडे पाहून अनुभवले. पण खरे पाहता ते योग्य आहे का ? ते कसे असावे ? हे त्यांनी फक्त कागदावर न सांगता जगून दाखवले. तेच त्यांच्या लेखणीला पुष्टी देणारे ठरले आणि हेच सारे म्हणजे माणसे कशी जगतात व त्यांनी कसे जगावे हे त्यांच्या काना-मना-नयनांनी पाहिले तेच त्यांच्या लेखणीने शब्दबध्द केलेले आहे.

स्वत:च्या जीवनाकडे तसेच इतरांच्या जीवनाकडे बघण्याची पती-पत्नीची एकमेकांची दृष्टी कशी असते, व ती कशी असायला हवी व समाज त्या गोष्टीकडे, त्या जीवनाकडे कोणत्या डोळ्यांनी बघतो, समाजाचा तरी चष्मा बरोबर आहे का ? या आणि अशाच चिंतना-मंथनातून त्यांच्या लेखनाला चालना मिळालेली दिसते. त्यांना भेटलेले सहप्रवासी, त्यांच्याशी गौरीताईंचा आलेला संबंध, याकडे समाजाने कोणत्या दृष्टीने पाहिले हे सारे गौरीताईंनी निसंकोचपणे सांगितले आहे.

त्यांच्या जीवनाचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनात स्पष्ट दिसते. समाजात विशेषत: स्त्री संदर्भात वस्तुस्थिती काय आहे ? ती सुधारणेचे द्योतक किती अंशी आहे, स्त्रियांना स्थान न देता कुटूंब, पर्यायाने समाज विलास करु शकतो का ? ज्या सुधारल्याचा आव आणतात, त्या आतून स्वतंत्र आहेत की तो फक्त मुखवटा आहे ? ही खळबळ त्यांच्या अंत:करणात चालू असते तेव्हा त्याचे वास्तव प्रगटीकरणच जणू त्या लेखनातून करतात असे जाणवल्याशिवाय राहत नाही.

## ३) लेखिकेच्या इतर साहित्याची संक्षिप्त माहिती :-

१९६० नंतर कादंबरी जगतात अनेकविध स्वरूपाचे बदल झालेले दिसतात. माणसामाणसातून स्वातंत्र्याचे चैतन्य सळसळत होते. प्रत्येकाच्या मनात मी माणूस आहे, मला माणूस म्हणा असा टाहो होता. त्याचबरोबर स्त्री ही स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व इतरांच्या निदर्शनास आणू देत होती. मी घरातील, समाजातील एक घटक आहे. मला विचार करण्याची कुवत आहे. किंबहुना मला आपले म्हणा असाच तिचा काहीसा आर्त पुकार होता. त्या प्रकारात अजूनही आर्तताच होती. पण अलीकडे काही स्त्रियांनी स्वत:चे वेगळे स्त्रीत्व दाखवण्याचा म्हणजे समाज किंवा (पुरुष वर्ग) स्त्रीला ज्या साच्यात बसवतो. ज्या मापाने मोजतो. ज्या दृष्टीने तिजकडे पाहतो त्यापेक्षा वेगळ्या पध्दतीने तिला साकारण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. पूर्वीच्या स्त्रीमधील नाजूक भावतरंग जोपासत आयुष्यभर स्वत:च्या मनाला, विचारांना कोंडून ठेवत, त्यांच्यावर एकप्रकारे अन्याय करत बसण्यापेक्षा त्या विचारांना मोकळी वाट करुन देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यांच्यामध्ये गौरी देशपांडे यांचे नाव प्रकर्षाने नजरेसमोर येते.

त्यांनी आपल्या साहित्य विश्वात रेखाटलेली स्त्री ही अबला, अगतिक किंवा स्वत:च्या बुध्दी मनाला गहाण ठेवून समाजातील इतर जणांच्या जात्यात भरडलेली दिसत नाही किंवा उगीचच स्त्री होण्याचे हळवे, नाजूक भावतरंग जपत त्यात सामावून जात नाही. तर ती एक सक्षम, स्वतंत्र, स्वयंभू दिसते. तिला तिच्या स्त्री असण्याचे दु:ख नाही किंवा त्यातून आलेले नैराश्य नाही.

दुसरे असे जाणवते की 'विवाह' या शब्दाकडे त्या पारंपारिक रुढार्थाने पाहत नाहीत. स्त्री-पुरुष यांच्यामध्ये शरीरसबंधाखेरीज अनेक नाती असू शकतात. मैत्री-प्रेम-आपुलकी, स्नेह या भावना स्त्री-स्त्री मध्ये किंवा पुरुषा-पुरुषामध्ये असल्या तर समाज मान्य करतो. पण त्या भावना स्त्री-पुरुष यांच्यामध्ये असल्या तर त्याकडे समाज कटु नजरेने बघतो हे त्यांना मान्य नाही. मैत्री, स्नेह जपण्यासाठी धर्माचे, जातीचे, पंथाचे बंधन असूच नये तसेच भिन्न लिंगी व्यक्तीमध्ये ही बंधनाचे स्तोम का ? हा त्यांचा खडा सवाल आहे.

शतकानुशतकाच्या परंपरेने चालत आलेल्या संकेतांनी मध्यमवर्गीय समाजातील झालेला स्त्री जीवनाचा कोंडमारा, व त्या कोंडमाऱ्यातून तिची सुटका करणे, समाजाच्या हिताचे आहे हे दाखवायला खरे तर आपट्यांपासून सुरवात झालेलीच होती. त्यांनतर अनेक स्त्रियांनी शिक्षणाने, वाचनाने सक्षमता येऊन स्त्री वेदनेचे हुंकार समाज मनात भरण्याचा प्रयत्न केला. पण सर्वात महत्वाचे म्हणजे अलीकडच्या या स्त्रीने तिथेच न थांबता स्त्री समाजातला एक स्वयंभू, स्वतंत्र अस्तित्व असणारा घटक आहे हे दाखवून दिले आहे.

'गौरी देशपांडे' यांच्या घरी तर बालपणापासून म्हणण्यापेक्षा त्यांच्या जन्माआधीपासूनच स्त्रीकडे बघण्याची दृष्टी बदललेली होती. त्यात त्यांचे परदेशात बऱ्याच वेळा जाणे, तेथे वास्तव्य. त्यामुळे तेथील संस्कृती त्यांच्या तना-मनात भरुन ती शब्द रुपाने वहाते आहे असे जाणवते. स्त्री सिगारेट ओढते किंवा मद्यपान करते हे त्या संस्कृतीत वर्ज्य नाही. पण आपल्याकडे ते करणारी स्त्री वर्तुळाबाहेरची मानली जाते. परपुरुषाच्या नजरेला नजर देऊन बोलण्याचे धाडस नसणारी आपली स्त्री, परपुरुषाबरोबर मैत्रीच्या, स्नेहाच्या नात्याने जवळीकता साधू शकत नाही. मग पुरुषी आचरण करणे दूरच. पण गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील स्त्री पुरुषाशी निखळ मैत्री करु शकते किंवा मद्यपान ही करते. गौरी ताईंच्या कथा-कादंबऱ्या वाचताना बऱ्याचवेळा त्यातील नायिकेच्या रुपात आपल्याला गौरी ताईंच्या विचारांचे दर्शन होते. त्याच्या कथा कादंबऱ्या वाचून झाल्या तरी त्यातील नायिकेचे विचार, मनात रेंगाळत राहतात. जीवन जगत असताना घेतलेल्या अनुभवाचे भावविश्व त्या आपल्यासमोर मांडतात.

१९७५ मध्ये जागतिक महिला परिषद भरली आणि स्त्रीवादी विचारांचे पडसाद प्रभावीपणे जागतिक पातळीवर सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि साहित्य क्षेत्रावर उमटले. स्त्रीवादी साहित्य मोठ्या प्रमाणावर व अत्यंत जागरुकतेने लिहिले जाऊ लागले. मराठी साहित्यात पहिल्या फळीत ज्या स्त्रीवादी आघाडीच्या (बिनीच्या) लेखिका मानल्या गेल्या त्यात गौरी देशपांडे अग्रगण्य मानल्या

गेल्या.त्यांच्या साहित्यातील स्त्रीही उच्चशिक्षित, समाजाचे स्वत:च्या जीवनाचे पूर्ण भान आलेली. जाणती आहे. कोणी लादलेले जीवन ती उगाळत बसत नाही.

फारसे माणसात मिसळणे त्यांना आवडणारे नसावे. पण म्हणजे माणसांचे वावडे आहे असे ही नाही. पण उगीच निरर्थक मैत्री, निरर्थक लोकसंग्रह, तसाच निरर्थक विचारविनिमय यापासून त्या दूर असाव्यात. त्यामुळे त्यांचे स्वत:चे असे एक वेगळे विश्व होऊ पहाते. कदाचित केशवसुतांप्रमाणे त्या एकलकोंडया होत्या असे म्हटले तरी चालेल. पण म्हणून त्या समाजाकडे पाठ न फिरवता उलट समाजाचा बदलणाऱ्या काळाप्रमाणे विचार करत असल्याची झाक त्यांच्या त्या एकटेपणात दिसते. फार लोकसंग्रह करणे, किंवा बेगडी माया, प्रेम, स्नेह जपणे आणि ह्दयात कोणालाच स्थान नाही हे त्यांच्यास्वभावात नसते. अजाणतेपणी जे काही लोक मग ते पुरुष असो किंवा स्त्री त्यांना मनापासून जीव लावणे. त्यांच्या सुखदु:खात सामील होताना स्वत:च्या पद-प्रतिष्ठेचा, कष्टाचा विचार न करता त्यांना आपले म्हणणे हे बरे असा त्यांचा स्वभाव दिसतो. अगदी हळव्या, भरभरुन येणाऱ्या पैकी त्या नसल्या तरी आनंदी असत.एकलकोंडया असल्या तरी माणसांचे वावडे असणाऱ्या नव्हत्या. स्वार्थासाठी, आवडत नसताना कोणाशीही नाते जोडण्यापेक्षा, थोड्याच जणांशी मनापासून स्नेहाने रहाणे त्यांना योग्य वाटते.

त्यांच्या कथा-कादंबऱ्यातील, निसर्गवर्णन प्रसन्नपणे मनाची आल्हादकता वाढवते. तसेच शेती, वावर येथील गडी माणसे, पिके, वनस्पती, तेथील कामे, यांचेही वर्णन येते. यावरुन शेती, तेथील लोकांचे जीवन त्यांनी जवळून पाहिले आहे,अनुभवले आहे. हे जाणवल्या शिवाय रहात नाही. जरी परदेशी जीवनाचा त्यांच्यावर प्रभाव असला तरी भारतीय त्यात खेड्यातील शेतकरी जीवनाशीही त्या एकरुप झालेल्या दिसतात. परदेशाची झगमगती दुनिया एकदा आत्मसात केल्यावर त्यातून सहजपणे कोणी भारतीय खेड्यात रमणारा नाही. त्याला ती दोन्ही जीवने दोन टोके वाटतील. पण इथे तसे दिसत नाही. जरी त्यांची नायिका परदेशी शिक्षण घेते, तेथील पध्दतीप्रमाणे वेश-केशभूषा करते पण तेवढीच ती शेतात, निसर्गात, झाडाझुडपांत ही रमते.

त्यांची 'निरगाठ' व 'चंद्रिके ग सारिके ग' ही कादंबरी नोव्हेंबर १९८७ ला मौज प्रकाशनाने प्रकाशित केली. 'निरगाठ' मध्ये चौकोनी कुटुंब म्हणजे पती-पत्नी व दोन मुली असे दाखवले आहे. त्यांच्या या कादंबरीत ही परदेशातील व्यक्तिचित्रे त्यांचे स्वभाव, वर्णिले आहेत. तोशी - ओजिसान,

योशियो – हिसायो अशी त्यांची मैत्रीची नाती जोडणारी नावे, मर्यादीत पात्रे पण आहे तेवढ्यांचा एकमेकांशी घट्ट प्रेमाचा संबंध. तेथे स्त्री–पुरुष भेद नाही. सर्वांची एकमेकांशी निखळ मैत्री.

त्यांच्या बऱ्याच कादंबऱ्यातील नायिकेने दुसरे लग्न केलेले असते. याही कादंबरीत नायिकेने पहिल्या नवऱ्यापासून फारकत घेऊन दुसऱ्या नवऱ्याशी संसार पूर्ण केला आहे. एक मुलगी पहिल्या पतीची व दुसरी दुसऱ्या पतीची. पण त्या पितापुत्रात किंवा बहिणी–बहिणी संबंधात देखावा नाही. तसेच हेवा–दावाही नाही. प्रेमळ संबंध आहे. या सर्वांना बांधणारी, एकत्र आणणारी नायिकेची कोणाशी तक्रार नाही. या कादंबरीत जंगल, त्यांचे वनस्पती प्रेम, त्यांच्या परदेशी मित्रांनी पाठवलेल्या वनस्पती, त्या त्यांना जपण्या–वाढवण्या पाठी मागे असणारा जिव्हाळा त्यांच्या शब्दाशब्दातून व्यक्त होतो. त्यांच्या साहित्यातून प्रकर्षाने जाणवते त्यांचे कुत्री व मांजरे यांच्यावरील प्रेम. 'निरगाठी' कथेतही त्यांची कुत्री व मांजरे यांच्याशी गाठ आहेच. यावरुन त्यांना या प्राण्यांची विशेष आवड असावी, असे स्पष्ट करावेसे वाटते. मुलींना घडवताना, वाढवताना, उगीचच भाबडे, हळवे स्त्रीपण न जपता नायिका मुलींना सक्षम बनवते. मुली आहेत म्हणून त्यांचे वैचारिक, बौध्दिक पंख छाटून न टाकता त्यांच्या पंखांना बळ देऊन उंच भराऱ्या मारण्यास तयार करतात. आणखीन एक जाणवते असे की त्यांना मुलांपेक्षा मुलींचा जास्त लळा असावा किंवा मुलगा नाही याची खंत त्यांना नसावी. साहजिकच आहे, त्या स्वत: मुलगा–मुलगी यांच्यामध्ये लिंगभेदाशिवाय कोणता भेद का असावा ? असे मानणाऱ्या पैकी होत्या. मुलगा नको असे नाही, पण नसेल तर खंत नाही असा विचार दिसतो.

या कादंबरीत नायक–नायिका यांचे वनस्पती प्रेम विशेष जाणवतं. झाडांच्या निष्ठेबद्दल, त्यांच्या निरपेक्षतेबद्दल त्यांना आगळा आदर दिसतो. ही कादंबरी त्यांनी पत्ररुपाने पुढे वाटचाल करत ठेवली आहे. व्यक्तीच्या मनातील भावनांची–विचारांची देवाण–घेवाण, त्यांना पत्रांतून साधलेली आहे. मुलीही उच्चशिक्षित, स्वयंपूर्ण रेखाटलेल्या आहेत. कोणी कोणावर काही लादत नाही किंवा कोणाला विरोधही करीत नाही. प्रत्येकाला आपले विश्व निर्मिण्याचे स्वातंत्र्य आहे. तरीही प्रत्येकाच्या मनात एकमेकांविषयी प्रेमाची 'निरगाठ' आहे. बरोबरचे जीवनातले सहप्रवासी गेले म्हणून आणि सारे सहन करून, एकमेकांशिवाय राहण्यापेक्षा सोबत जीवनाचा प्रवास संपवतात. शेवटी उरते कादंबरीभर फिरणारे नायिकेचे निखळ, सर्वांना प्रेम–माया देत जगणारे व्यक्तिमत्व !

याच पुस्तकात दुसरा भाग 'चंद्रिके ग सारिके ग' या छोट्या कादंबरीचा आहे. या कादंबरी तर गौरीताई स्वत: जवळून पाहिलेले अनुभवलेले अनुभव कथन करताहेत असा भास होतो. त्यांच्या इतर

कथा, कादंबऱ्या प्रमाणे याही कादंबरीतील नायिका 'सुहास' ही स्वतंत्र व्यक्तिमत्वाची आहे. 'विवाहा' विषयी तिच्या मनात इतर स्त्रीसुलभ भावना नाहीत. शिक्षण घेऊन आई-वडिलांच्या किंवा इतरांच्या मताप्रमाणे लग्न करुन चारचौघीसारखा संसार करणारी नाही. लग्न करणे, संसार, मुले-बाळे एवढेच जीवन असते या विचारापासून ती दूर आहे. ती उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत जाते. तिथे पीएच्. डी. पदवी संपादन करते. तिथे तिच्या आयुष्यात एक पुरुष येतो. त्याच्याकडे ती मित्र नात्याने बघते. लग्न का करावे ? त्यांनी जीवनात पोकळी निर्माण होऊ शकते का ? लग्न करण्याची मनाची तयारी नसेल तर केवळ सारे म्हणतात म्हणून लग्न करणे ती मानत नाही. सर्वांवर तिचा जीव आहे, प्रेम आहे. मोठ्यांविषयी आदर आहे पण हे सारे असले तरी त्यांचे ऐकून स्वत:च्या मनाशी अप्रमाणिक राहणारी नाही वेगळे असे मानणारी आहे.

याही कादंबरीत शेती, वावर, वनस्पती, प्राणी यांचा उल्लेख आहे. त्यांच्या विश्वात जीवनात जे आले त्यांच्यापासून त्या कधी दूर पळालेल्या दिसत नाहीत. प्रियकर, मित्र म्हणतो म्हणून ती नायिका अमेरिकेत राहत नाही किंवा त्यांच्या मनाविरुध्द त्यालाही इकडे येऊन राहण्याचा स्त्री हट्ट ही करीत नाही. ती जशी स्वत:च्या मनाशी प्रतारणा करत नाही तशी त्याने का करावी ? म्हणजे प्रत्येकाला व्यक्तिस्वातंत्र्य जपण्याचा अधिकार आहे हे स्पष्ट होते. जीवनात जे काही नात्याच्या रुपाने, मित्रत्वाच्या रुपाने लोक आले त्यांच्यावर प्रामाणिक, मनापासून प्रेम करते. मग तेथे स्त्री-पुरुष हा भेद नाही. किंवा वयाचे बंधन नाही. तिची मैत्रिण मालविका तिच्या वर एकलकोंडी किंवा आतल्या गाठीची असण्याचा आरोप करते पण त्याच वेळी ती आनंदी आहे याचीही कबूली देते.

कोणाशी मैत्री करताना समाज काय म्हणेल ? हा विचार तिला वेडगळ वाटतो. पुरुषी सहवासाचे तिला वावडे नाही किंवा पुरुषांकडे बघण्याचा तिचा दृष्टिकोन ही तिरस्करणीय नाही पण तेवढ्यासाठी रुढी जपून विवाह करायलाच हवा असेही तिला वाटत नाही.

शेवटी मालविकाला अंतसमयी स्वत:च आधार देते. त्यावेळी तिच्या प्रेमाची खरी कसोटी असते. मालविकाही आपण सुहासकडेच राहायचे मान्य करते. यातच तिच्यावरील विश्वास, निखळता दिसते. आईची माया, मैत्रीमधील मधुरता, विश्वास, निरपेक्षता अनेक नाती ती जपते. ज्याला आपले म्हणते, तेथे मनापासून ओलावा देते. तिच्या जाण्याने स्वत:मध्ये पोकळी निर्माण झाल्याचे सांगते.

परदेशी संस्कृतीचा कोरडेपणा व भारतीय संस्कृतीतील ओलावा, अलिप्तता, आपलेपणा यांची सांगड घालत ती नायिका आपले वेगळे स्त्रीपण सिध्द करते.

**'आहे हे असं आहे'**

गौरी देशपांडे यांचा हा कथासंग्रह १९८२ ला ऑगस्टमध्ये प्रकाशित झाला आहे. यामध्ये लहान–लहान २४ कथांचा समावेश आहे. या कथांतील स्त्री ही त्यांच्या इतर नायिकांप्रमाणेच शिक्षण घेतलेली, नोकरी करणारी अशी आहे. ती असहाय्य, दुर्बल, हळवे स्त्री भाव जपत दु:खाचे, आलेल्या प्रसंगाचे इतरांसमोर विवशतेने प्रदर्शन करत बसणारी नाही.

तसेच त्यांच्या सर्व कथा नायिका या आपल्या पतीस अरे–तुरे बोलणाऱ्या आहेत. म्हणजे ती अगदी अलीकडची आहे. दुय्यम स्थान न स्विकारता त्याच्या बरोबरीने वावरणारी आहे. एकमेकांचे व्यक्तिस्वातंत्र्य जपणारी आहे. ओहोटी कथेतील नायिका 'लग्न' या विषयी वेगळी मते असणारी आहे. ती म्हणते ''प्रेम ही दोन व्यक्तिंमधील व्यक्तिगत बाब असते तर लग्न ही सामाजिक व कायद्याची बाब आहे. याचा खरं म्हणता एकमेकांशी काय संबंध ?'' अशी प्रेम किंवा लग्न याविषयी मते असणारी नायिका लग्नाशिवाय एका मित्रा बरोबर रहात असते. कालांतराने त्याने दुसऱ्या मुलीशी लग्न केल्याचे कळते तेव्हा ते ती तटस्थपणे स्वीकारते. लग्न हा प्रत्येकाचा व्यक्तिगत प्रश्न आहे. एकमेकांच्या जीवनात दखल घेत नाहीत.

त्यांच्या कथांतील नायिका इंग्रजी साहित्याची जाण असलेली आहे. अधूनमधून कोठेतरी परदेशाचा तेथील संस्कृतीचा, उल्लेख असतोच. 'उद्दालक ऋषीची बायको' मधील कमला नवऱ्याने घर सोडून जायला सांगितले तरी जात नाही. 'का म्हणून मी जाऊ ? घर काय तुझे एकट्याचे आहे ?' असा प्रश्न विचारुन स्वत:चे त्या घरातले अस्तित्व, हक्क सिध्द करते. 'पाऊस आला मोठा' मध्येही नायिका वडिलांच्या किंवा सावत्र आईच्या मनाप्रमाणे लग्न न करता शिक्षण घेऊन नोकरी करते. तसेच त्यांच्या कथांतील बहुतेक नायिकांना मुलीच असल्याचा उल्लेख असतो. आणखी म्हणजे 'कलिंगड' कथेत नायिका मूल दत्तक घेते तीही मुलगीच. हे सर्व त्यांच्या जिवंत अनुभवाचं प्रतीक वाटण्याइतकं स्पष्ट आहे. शिवाय आणखी एक जाणवण्याइतकी गोष्ट म्हणजे त्यांची नायिका ही इतरत्र कथा कादंबरीत भेटते तशी खूप सुंदर, गोरी, अशी आढळत नाही. तर ती सावळी, तसेच दिसायला बेताचीच असते. ती देह सजवण्याकडे कमी लक्ष देते. एकूणच त्यांची नायिका शरीरसौंदर्य जोपासून स्त्रीत्वाचा नाजूकपणा कुरवाळत बसण्यापेक्षा वैचारिक, बौध्दिक सौंदर्य जोपासून, वाढवून समाजातील आपले स्वयंसिध्द अस्तित्व सिध्द करु पहाते.

या संग्रहातील 'देणं' ही कथा उत्कृष्ट कथा वाटते. पत्नी अमेरिकन पती पंजाबी. ती गर्भार आहे हे कळल्यावर तिचा नवरा खुश होतो पण ती बाळाला जन्म देण्यास नकार देते. पती दुर्दैवाने मरतो. नायिका बाळाला घेऊन भारतात तिच्या सासरी येते. सासरच्या लोकांना नवऱ्याच्या मृत्यूनंतर मिळणारे पैसे देते. खेडेगावातील परिसराचे वर्णन वास्तव रुप धारण करते.

'आता कुठं जाशील टोळंभट्टा' मधील नायिका परपुरुषाविषयी वाटलेल्या भावनेचा वेगळ्या पद्धतीने स्वीकार करते. आपण करतोय ते बरोबर की चूक? असा प्रश्न तिच्या मनाला कधी पडत नाही. तिच्या मते या सर्वांचा माझ्या वैवाहिक जीवनाशी किंवा पतीशी काही संबंध नाही असे प्रतिपादन करते. म्हणजे वैवाहिक जीवन व प्रेमभाव या दोन गोष्टींना ती वेगवेगळे समजते.

त्यांच्या कथांतील नायिका उंबरठा ओलांडून बाहेर पडलेल्या स्त्रीच्याही पुढे जाऊन स्वत:कडे, समाजाकडे तिच्या अस्तित्वाकडे तसेच तिला मिळणाऱ्या स्थानाकडे जागरुकतेने, दृष्टीने बघणारी आहे असे जाणवते.

## 'अरेबियन नाईटस' (अनुवाद लेखन)

कथा वाङ्मय, अनुवाद लेखन क्षेत्रातही स्त्रियांचे योगदान महत्वाचे आहे. यात दुर्गाबाई भागवत यांनी केलेले पाली भाषेतून जातक कथांचे अनुवाद (सात खंड) व गौरी देशपांडे यांनी केलेले 'अरेबियन नाईटस' या कथांचे अनुवाद (१४ खंडात) महत्वाचे आहेत.

'रिचर्ड बर्टनच्या' इंग्रजी अनुवादावरुन गौरी देशपांडे यांनी त्या मराठीत आणल्या. यामध्ये अद्भूत, सुरस अरबी कथांचा समावेश आहे. हा एक प्रकारचा ऐतिहासिक, समाजशास्त्रीय, मानववंशशास्त्रीय खजिना आहे असे त्यांचे मत आहे. बऱ्याच अंशी त्यात अश्लील वर्णने आहेत. बर्टन यांनी ती जशीच्या तशीच ठेवली आहेत. गौरी ताईंनी ही त्यात बदल केलेला दिसत नाही कारण ती तशीच ठेवणे हा अनुवादाचा दंडक असतो. अन्यथा त्यांच्या मूळ गाभ्याला भिडता आले नसते. त्यास रसहानी पोहोचली असती.

विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी तिला बदलून, त्यातील अश्लिलता कमी करुन ती मराठीत आणली. तरीही कथानकासाठी आवश्यक ती भाषा वापरणे गौरी देशपांडे यांना साधलले दिसते.

उदा. "ज्याला कुणी नाही दाखवला रस्ता
तो वाट चुकून भटकलेला नुस्ता"[१]

मराठी शब्द योजताना त्यांनी कसब पणाला लावलेले दिसते. यावरुन इंग्रजीचा गाढा अभ्यास, भाषेवरचे प्रभुत्व व परिश्रमपूर्वक केलेले प्रयत्न दिसून येतात. शब्दाचा प्रवास तपासताना त्यांना अनेक अरबी शब्द मराठीत रुप बदलून आलेले सापडतात. उदा. मूळ अरबी शब्द 'बांज' हा 'भांग' बनून हिंदुस्थानात आला असे त्या म्हणतात.

अरबी जीवनाचे वास्तव रुप दाखवणारे काही अत्यंत ग्राम्य व अचकट-विचकट शब्द येतात. ते न बदलता त्यांनी तसेच ठेवले आहेत. भाषेचा पोत एकूणच खडबडीत आहे. पण हेतुपुरस्सर त्यांनी तो तसाच ठेवला आहे. काही शब्दही त्यांनी रुपांतरीत केले नाहीत. उदा. 'मूर्तझा' म्हणजे अल्लाने निवडलेला हत्यारबंद सैनिक. असे काही शब्द तसेच योजले आहेत.

सौंदर्यवर्णनातील काही उपमा सुंदरतेची ग्वाही देतात. उदा. अनिमोनीसारखे लाल गाल, सुलेमानच्या अंगठीसारखे मुख, जरीच्या कापडाच्या बिंडाळी सारखे शरीर इ.

या अनुवादाचा कालखंड १९७५ ते ८४ असा आहे. एकूणच एवढं प्रचंड लेखन आहे. भाषेतील खडबडीतपणाही बेगडी गुळगुळीत पणापेक्षा सरस वाटतो. अश्लिलतेकडे पाठ फिरवता ते लेखन सात्विक झाले असते पण त्यातील गम्यता, रम्यता नष्ट पावली असती कदाचित हे जाणून त्यांनी आहे तसेच समोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. यावरुनच त्यांच्या स्वभावधर्मही देखाव्यापेक्षा आहे हे असे आहे असा असल्याचे जाणवते.

### 'दुस्तर हा घाट' व 'थांग' - १९८९

'दुस्तर हा घाट' यामधील नायिका नमू अनाथ आहे. पण विशेष म्हणजे ती ही इंग्रजी शिक्षण घेतलेली, धीट, समंजस आहे. शिक्षण घेत असतानाच एका सरांचा जवळून परिचय होतो. त्या सरांच्या घरी ती राहायलाही जाते. त्यांची पत्नी हयात नसते तरी ती तिथे जाते. म्हणजे एका पुरुषाच्या घरात परस्त्रीने येऊन राहणे हे समाज मान्य नाही. तरीही ती योग्य वाटते ते करते. त्यांच्या उच्चशिक्षित, हुशार मुलाशी लग्न करते. काही दिवसांनी त्याला मूल होणार नाही हे समजते. एवढ्या प्रचंड धक्क्याला धीटपणे सामोरे जाते. स्त्री सुलभ नाजुक, हळवे मन घेऊन उगीचच त्याचा बाऊ करत नाही.

नंतर तिचा नवरा वनमाळी हा बाहेरख्याली आहे हे, समजते तेव्हा विचलित होते. पण लगेच सावरुन त्याला काही न म्हणता स्वत:च्याच जगण्याची दिशा बदलते. तिथे ही ती व्यक्तिस्वातंत्र्य जपते. सासरे हरिभाई हे सर्व प्रॉपर्टी तिच्या नावे करतात. यात तिच्या स्त्रीत्वाचा विजय आहेच. त्यांची शेती-वाडी, गडी-माणसे, गुरे-जनावरे हा सारा पसारा सांभाळत राहते. या कादंबरीतही निसर्गवर्णन मनाला

भुरळ घालते. कुत्री, शेती संबंधीत प्राणी, तसेच पिके, वनस्पती यांचे वर्णन आहेच. जरी ती शिक्षित असली तरी या सर्वांकडे पाठ फिरवत नाही किंवा स्त्री आहे म्हणून पतीशी भांडण्यात स्त्रीत्वाचा आव आणण्यापेक्षा स्वतंत्र बुध्दीने विचार करते. तिच्यातले अबलापण लोपवून सबलापण सिध्द करते.

याही कादंबरीत तिचा परदेशी प्रवास आहेच. तेथील नवऱ्याच्या मित्रांशी मैत्री करते. मोकळेपणाने वागते. ॲलिस्टर, नकुल इ. वनमाळीच्या मित्राशी स्नेह, सलोखा ठेवते. नवरा आला तरी त्याचे स्वागत. नाही आला तरी फारसे दु:ख वाटून न घेता त्याचा स्वभाव गुण-दोष सारे स्वीकारत राहते. सासऱ्यांच्या मृत्यूची खंत, माया, आठवणींनी व्याकूळ होते.

कमीच पात्राभोवती कादंबरी फिरत राहते. पण तरीही प्रत्येक व्यक्तीच्या विचारांना स्वतंत्र वाव आहे. कादंबरीभर फॉरेन संस्कृतीचा वावर आहेच. लेखिका त्या ठिकाणी जाते तिथे वातावरण त्याच्या काना-मनावर बिंबलेले असते. माणूस जे बघतो. अवलोकन करतो. ते विचार, तो परिसर यांच्याशी त्याचे नाते पक्के होते. त्या अनुभवाशी प्रामाणिक राहून जे लिहिले जाते ते अंत:करणातून अगदी आतून आलेले असते, ते इतरांच्या काळजाला भिडते. असेच त्यांच्याही बाबतीत होते.

एकमेकांना एकमेकांची मानसिक, शारीरिक गरज आहे, असते पण ती कुणा एकावर कुणा एकाने लादलेली नको. तर ती स्वीकारलेली हवी. असे त्यांच्या साहित्य वाचनातून दिसते.

'थांग' मधील कालिंदी व नंदन ही पती-पत्नी. त्यांच्यात मतभेद होतात. ती ही शिकलेली असते. पटत नसताना एकमेकांच्या विरोधात रहाण्यापेक्षा वेगळे मार्ग पत्करते. कुठेतरी नोकरी करायचे ठरवून नवऱ्यापासून वेगळी होते. त्या दरम्यान ती दिमित्रीच्या प्रेमात पडते. ते तिच्या नवऱ्याला माहित असल्याची तिला खंत नसते. प्रत्येक कथा-कादंबरी प्रमाणे इथेही दोघांनी एकमेकांचे स्वातंत्र्य जपल्याचेच जाणवते.

एकूणच त्यांच्या कादंबरीतील स्त्री बंडखोर, धीट, नीती-अनितीचे बंधन न मानणारी, किंबहुना नीती-अनितीच्या प्रश्नच स्वत:ला पडू न देणारी वाटते.

**'विंचुर्णीचे धडे' - १९९६**

गौरी देशपांडे यांचे हे वाचक दृष्टीने तसे महत्वाचे पुस्तक. या त्यांच्या पुस्तकात त्यांच्या आत्मकथेचे स्वरुप दडलेले आहे. एकूण १४ भागात त्यांनी विभागलेले हे 'धडे' आपल्यालाही बरेच धडे देऊन जातात. या वाचनातून त्यांच्या स्वभावाचे, गुणा अवगुणांचे बारकावे नजरेस येतात. एकंदर विचार

करता अतिशय सूक्ष्म छटाही चुकत नाहीत. त्यांच्या मनाचे भावतरंग मनात खूप वेळ तरंगत राहतात. विचार करायला लावतात. वाचताना त्या आपल्याशी मैत्रीच्या नात्याने गप्पा मारताहेत असे वाटते. मैत्रीचे नाते शुध्द, पारदर्शक असते. तेथे आडपडदा नसतो. तशाच पद्धतींनी त्या आपल्याशी हितगुज करताहेत असे वाटते. प्रत्येक प्रकरणागणीस त्यांच्या स्वभावाचे, मनातील विचार प्रवाहाचे पदर उलगडत जातात.

प्रास्ताविकातच त्यांनी आपल्याला किंवा आपल्या लिखाणाला कोणी विशेष महत्व द्यावे, त्यांच्याकडे कोणी बोधवाचक दृष्टीने पहावे, अशी अपेक्षा नसल्याचे नमूद करतात. जे अनुभवले, समजले, जाणले, दिले-घेतले ते त्यांनी सरळ, प्रामाणिक, स्वच्छपणे लिहिले आहे. त्यांच्या लेखनात, त्यांच्या जवळजवळ प्रत्येक कादंबरी कथेत, वनस्पती, पिके, जनावरे, कुत्री, मांजरे, शेती, वावर यांना जवळून पाहिल्याचा, त्यांच्याशी नाते असल्याचा जो प्रत्यय येतो, त्याचे मूळ या विंचूर्णीत आहे असे वाटायला लागते.

वर्षातून एकदा तरी परदेशात जाणाऱ्या, तेथील व्यक्ती, व्यवहार, व्यवसाय, जवळून बघणाऱ्या त्यांच्या सुधारणावादी, प्रगतशील, क्रांतिकारी बदल हवा वाटणाऱ्या, जीवन प्रवाही असावे या मताच्या गौरी ताईंना तितकेच खेड्यातील जनजीवन, माणसे, जनावरे जवळची वाटतात. पण त्यामध्ये त्या सेतू बांधू पहातात. त्यांच्यातील अंतर कमी करण्याचा प्रयत्न करतात.

त्या स्पष्ट सांगतात की, या खेडेगावाचा मला आताच अनुभव आहे असे नाही, तर आईकडून लहानपणापासून ऐकलेले होते. शिवाय बहीण फलटणला होती, तिचेकडे जाणे-येणे होते. पण तरी सुध्दा ते पाहुणेपण वरवरचे होते. तेथे म्हणजे विंचुर्णीत स्वत:चे घर बांधले नंतर प्रत्येक दिवसाशी, माणसाशी, पिकांशी, तेथील उणेपणाशी, जवळून संबंध आला. तो आपला स्वत:चा होता.

शहरातील सुखसोयीयुक्त जीवन वाट्याला असून घराण्यातील परंपरेप्रमाणे खेड्यातील लोकांसाठी त्यांच्या राहणीमानाशी, त्यांच्या बरे-वाईटपणाशी सुखापेक्षा दु:खाशी आपले प्रेमळ नाते जोडण्यासाठी त्यांनी तेथे राहण्याचे कबूल केले. तेथेही त्या प्रामाणिक, स्वच्छ, पारदर्शक जीवनजगल्याचे दिसते. कुणी निंदा, कुणी वंदा, मी अशी आहे हे खरे या भावाने. उदा. स्टँडवर उतरल्यावर दुकानात त्या रमची बाटली मागतात. दुकानदार बांधून देऊ लागतो. तेव्हा त्या म्हणतात, "प्यायची लाज वाटत नाही मग लपवायची कशाला?" व ती तशीच घेऊन जातात. तसल्या खेडेगावात

त्यातही रानात राहूनही आपला पोषाख जो त्यांना सुटेबल वाटतो तोच त्या वापरत. पँट व टी शर्ट असा. कोणी नावे ठेवील असा मनात किंतू नाहीच.

जरी त्यांचा वेश किंवा केशरचना निराळी असली तरी त्यांचे मन पूर्ण स्वच्छ, प्रामाणिक, प्रेमळ आहे असे जाणवते. 'माणसाने माणसाकडे माणुसकीने पाहणे' ही जर माणुसकीची व्याख्या असेल तर त्यांच्याकडे पुरेपूर माणुसकी होती असे म्हटल्यास वावगे ठरु नये. मग त्यात जात, धर्म, शिक्षण, वय, पद, प्रतिष्ठा, पैसा एवढेच काय स्त्री किंवा पुरुष असाही भेद नव्हता. घरातील नोकरांनी त्यांचा जपलेला स्नेह, त्यांनी त्यांना दिलेली वागणूक पहाता याची प्रचिती येते. माणूस प्रथम माणूस आहे, नंतर आपण त्याला इतर विशेषणे लावतो हे खरे वाटते. इतरांच्या दु:खाने हळहळ वाटते . ती नुसती वाटून त्या तटस्थ रहात नाही तर त्यांना यथाशक्ती कोणत्याही परीने मदतीचा हात पुढे करत.

तसेच इतरांच्या आनंदाने सुखावतही असत. भले माझे कपडे वेगळे असतील, रहाण्याची पध्दत, विचार करण्याची पध्दत निराळी असेल पण मी तुमच्यातलीच आहे, अशाच भावाने सर्वांशी वागत.

घराण्यातील समाजसुधारणेचा वारसा रोमा-रोमांत भिनलेला असल्यामुळे, तेथील माणसांचे वागणे गौरीताईंना खटकते. पण फक्त भावना व्यक्त करुन, काय होणार असे वाटून गप्प न बसता, समेटाने त्यांच्या मनावरील जाती-भेदाचा पडदा दूर करु पाहतात. तेथील परिस्थितीशी माणसांशी समझोता करुन घेताना कष्ट पडले तरी ते कष्ट न मानता स्वीकारण्याची तयारी ठेवतात. अबोल वनस्पती, मुके प्राणी यांच्याबरोबर अशिक्षित, असमज लोकांशी प्रेमाचे संबंध, एक अनामिक नाते निर्माण करण्याचा त्यांचा स्वभाव दिसतो. गड्या माणसांच्या, उदा. गोरख, नानी यांच्या खाण्यापिण्यापासून त्यांच्या हौस, मौजेचाही विचार करताना स्वत:ला झळ पोहचल्याचीही खंत वाटू देत नाहीत.

पण शेवटी त्यांच्या या सुधारणावादी, प्रगतशील, चिंतनशील, मनाला अनेक प्रश्न पडतात. या परिस्थितीला कारण आपले सरकार जसे तशीच आपली जनताही आहे हे सत्य त्यांना उमगते. अनेकांनी म्हणजे ऋषी-संतांपासून, समाजसुधारकांनी रक्ताचे पाणी अन् हाडाची काडे केली तरी संबंध माणूस कधी बदललाच नाही. मग आपण तरी कोण ? असे वाटून चुकीचे, अपयशाचे खापर स्वत:च्याच माथी घेतात हाही त्यांचा मोठेपणाच.

सर्वांना मनापासून जीव लावतात. निर्भेळ प्रेम देतात. पण त्यांना मात्र तसे प्रेम मिळत नाही. त्यांच्याकडे बघण्याची लोकांची दृष्टी ही निर्मळतेची नसते. हे लक्षात येते तेव्हा ही नाराज न होता स्वत:च्याच मनाला पटवून देतात. प्रेम करणे, स्नेह देणे, आपले समजणे हा आपला धर्म. तसेच अगदी

तेवढेच कोणी आपल्याला प्रेम, माया द्यावी अशी अपेक्षा करणेच चूक. जे मागून मिळत नाही, विकत मिळत नाही, त्याच्या विषयी खंत वाटून घेणे चुकीचेच. इतका समजूतदारपणा ही त्यांच्या स्वभावाचा विशेष आहेच.

हे सारे वाचल्यानंतर एक जाणवते की, त्यांच्या कथेतील नायिका तटस्थ किंवा व्यक्तिस्वातंत्र्य जपणारी, स्वत: सर्वांवर मनापासून प्रेम करणारी आहे. याचे पाणी या विंचुर्णीत मुरत असावे. कारण तेथे त्यांना जीवनाची अशी दिशा मिळाली. असेही लोक असतात याची त्यांना आलेली प्रचिती येते.

तेथे त्यांना जीवनाच्या गाठीशी जे अनुभव आले ते सांगताना अखेर त्या सांगतात की मी विंचुर्णीला काही देऊ शकले नाही. म्हणजे नोकरांशी नोकरांसारखे न वागता, त्यालाही माणूस म्हणून प्रेम देतात. कुत्र्या-मांजरांना, झाडा-झुडपांनाही जीव लावतात. शक्यतो आपल्या परीने आदर्शवत जीवनाचा पाठच जणू विंचुर्णीकरांना पढवतात. पण लोक आहेत तेथेच आहेत. त्यांच्यात घेण्याची,बदल करण्याची कुवत नसल्यासारखे. हे जाणूनही, कमीपणा स्वत:कडे घेतात. आपण लायक नाही, आपण फक्त पुस्तकांतून सुधारणा घडवून आणू शकतो. आजोबा, आजीसारखे कृतीशील नाही आहोत, असा स्वत:ला बोल लावतात. यातच त्यांच्या प्रामाणिक, स्वच्छ, लखलखीत अंत:करणाचा ठाव आपले मन घेते.

या त्यांच्या निबंधातून त्यांच्या अनेक गुणांची खात्री पटते. स्पष्टपणा, निर्भीडपणा, प्रामाणिक, प्रेमळपणा, समता, बंधुता तसेच स्वयंपाकाची आवड असणे, परदेशातील झगमगाटी जीवनाचा लाभ घेऊनही लोभ नसणे, आपल्याबरोबर इतरांनीही सुधारणेचे प्रगतीचे पाऊल टाकण्यास प्रवृत्त करणे, आत एक बाहेर एक म्हणजे 'दाखवायचे दात निराळे' असे न राहणे, असे अनेक गुण आपल्या नजरेस येतात.

स्त्री आहे म्हणून मुले, संसार, फार तर नोकरी एवढे व हेच करणे म्हणजे जीवन असे न मानता, त्या समाजाची मी घटक आहे, त्या समाजाशी माझे नाते आहे, म्हणजे त्यांच्या सुखदु:खात सहभागी होणे हा माझा धर्म आहे. हे बालामृत त्यांनी पचवलेले दिसते. मग ती स्त्री आहे का भाग दुसरा आहे.

परदेशात खूप काळ वास्तव्य करुनही त्यांच्या मनाचे पाय विंचुर्णीसारख्या खेड्यात, तेथील माळाच्या मातीत, तळ्यात रुतून बसतात याचे कारण त्यांनी प्राशिलेले बालामृत व त्याने पोसलेला त्यांचा पिंड! ''खरे तर हे एक हलके, फुलके पुस्तक गौरीबाईंच्या नर्मविनोदी उपरोधिक शैलीने, प्रसन्न व्यक्तिमत्वाने संपन्न असे लिखाण.''[२] असे अश्विनी धोंगडे म्हणतात.

**'तेरुओ' आणि 'कांही दूरपर्यंत'**

'तेरुओ' या छोट्या कादंबरीत लेखिकेने प्रेमकथेच्या जवळची वाटावी अशी कथा योजिली आहे. ही कथा भारतीय नायिका पत्ररुपाने कथन करते आहे असे दाखवले आहे. तिच्या उतारवयात तिला जपानच्या वास्तव्यात 'तेरुओ' नावाची व्यक्ती भेटते. तिच्या ही नकळत त्याही वयात त्याच्या प्रेमात पडते. त्या पुरूषाचे रुप, रंग तिला मोहविते. ती नायिका सांगते, मी कोणत्या देशाची आहे, किती वयाची आहे यापेक्षा मी स्त्री आहे. माणूस आहे बस ! कारण एक विवाहीत स्त्री, अर्ध्याहून जास्त वयाची, अशा एका अकल्पित वयात पटकन एका परपुरुषाच्या प्रेमात पडणे हे भारतीय तसेच जपानीही संस्कृतीला पटणारे नव्हते. असे ऐकून ती वरील स्पष्टीकरण देते. म्हणजे गौरी देशपांडे यांच्या स्वभावाची छाप नायिकेच्या विचारात आपल्याला पानोपानी उमटलेली दिसते.

पण इथे ही स्वत:चा पोक्तपणा कबूल करते. माझे तेरुओवर प्रेम जडले, मला आवडला तसेच त्यानेही माझेवर प्रेम करावे किंवा मी त्याला आवडावे अशी बालीश, पोरकट अपेक्षा ती करीत नाही. याचा अर्थ प्रत्येक व्यक्ती ही स्वत:शी प्रामाणिक राहू शकते. कोणा एका साठी स्वत:वर कोणा एकाचे मत लादून घेणे पसंत करत नाही तसेच आपले ही मत लादण्याचा प्रयत्न करीत नाही. तिचे प्रेम हे शुध्द, प्रामाणिक आहे असे ती समजते. त्यामुळे ती नवऱ्यापुढे लपवण्याचा प्रयत्न करत नाही.

या कादंबरीत जपानी संस्कृतीची, तेथील नियमबध्दता, चालीरिती, माणसांचे स्वभाव, गुण–दोष, तसेच निसर्ग वर्णन, काही स्थळे यांची लेखिकेने चांगलीच ओळख करुन दिली आहे. अनेक देश जवळून पाहिले. बऱ्याच देशातील लोकांशी, संस्कृतीशी जवळचा संबंध आला तरी एक सिध्द होते की नायिका भारतावर प्रेम करते. आकाशात कितीही उंच भरा–या घेतल्या तरी तिचे पाय जमिनीवरच आहेत. जपानी लोक शिस्तप्रिय, नियमांच्या चाकोरीत बध्द आहेत पण त्यांची मने ही तशीच तटस्थ आहेत. त्यात प्रेमाचा अभाव तिला प्रकर्षाने जाणवतो. नायिका म्हणते, ''इथे शिकलेली, पैसेवाली माणसे अशी निर्घृणपणे वागत असतात, हेवा वाटण्यासारख्या देखण्या आणि समृध्द देशाच्या अंतरंगात अशी कुरुपता!'' (संदर्भ ८१)

त्यापेक्षा तिला आपल्या देशातील लोकांचे औदार्य, स्नेह प्रभावित करते. नायिकेला मानवी जीवनात प्रेम, स्नेह या शब्दांची ओढ आहे. त्यामुळे जपान मला आवडला नाही, असे खरेपणाने ती सांगून टाकते.

नायिका तिला आदरणीय वाटणा-या तेरुओला पत्ररुपाने मनातील विचार सांगून कथानक पुढे गतीमान ठेवते. 'तेरुओ' या जपानी शब्दाचा अर्थ 'उगवता सूर्य'. त्या सूर्याच्या स्वच्छ, शुध्द, प्रकाशासारखेच तिला 'तेरुओ' चे भाव वाटतात. मागणी, दु:ख, खेद, तक्रार नव्हते त्यात तर होते, सहज सुंदर सरळ प्रेम.

नायिका तिचा स्वभाव सहज सुलभ, हातचं राखून ठेवणारा नाही असे सांगते. पण पुढे म्हणते या माझ्या स्वभावाला लोक विक्षिप्तपणा म्हणतात. त्यामुळेच की काय नायिका लोकांशी आपला संबंध काहीसा अलिप्त ठेवते.

'प्रेम' या शब्दाकडे संकुचित दृष्टीने न बघता त्याला व्यापक रुपात रुंदावणारी अशी ही नायिका वाचताना तिच्यामध्ये गौरीताईंच्या विचाराचा प्रभाव असल्याचे जाणवते. भावना विश्वाशी नाळ जुळल्याचा भास होतो. ''तंत्राचा संशयही येऊ न देता अत्यंत तंत्रशुध्द कांदबरी लिहिणारी एकमेव लेखिका''[३] असे प्रभा गणोरेकर म्हणतात.

**'काही दूरपर्यंत'**

गौरी देशपांडे यांच्या या छोट्या कादंबरीतील नायिका त्यांच्या इतर कथानकातील नायिके सारखीच आहे. शिकलेली, जाहिरात कंपनीत नोकरी करणारी आहे. त्यांची नायिका ही चारचौघीहून निराळी असते. इतर स्त्रिया प्रमाणे घर-संसार-मुलं- नोकरी एवढेच तिचे विश्व नसते. त्याच्याही पुढे जाऊन म्हणजे काहीसे पाश्चात्य संस्कृतीचे वारे लागलेली दिसते. परक्या पुरुषांशी दोस्ती करताना, एवढेच काय त्याच्याशी शरीरसंबंध ठेवताना ती फक्त स्वत:च्या मनाचा विचार घेते. मद्य पिणारी, परपुरुषांशी मोकळे संबंध ठेवणारी स्त्री शरीर संबंधांना शारीरिक भूक एवढेच महत्व देणारी आहे.

लहानपणीची आई विना पोरकी, वडिलांच्या रागाला बळी पडणारी, भित्री अशी जसू या कादंबरीत त्यांनी नंतर धीट, व्यक्तिस्वातंत्र्य जपणारी रेखाटली आहे. अशा प्रकारे त्यांच्या साहित्यातून त्यांच्या स्वतंत्र विचार शैलीचे, जीवन पद्धतीचे दर्शन घडते.

**सारांश**

गौरी देशपांडे या लेखिकेच्या कुटुंबाचा सामाजिक सांस्कृतिक आणि शैक्षणिक अंगाने झालेला विकासवृत्तांत या भागात आलेला आहे. त्याबरोबरच गौरी देशपांडे यांच्या कादंबरी निर्मितीचा स्थूल आढावाही घेतला आहे.

गौरी देशपांडे यांचे लेखन स्त्रीवादी असल्यामुळे ओघाने त्यांची कादंबरी नायिकाप्रधान आहे. एवढेच नव्हे ती स्त्रीवादाचे जिवंत उदाहरण आहे. कादंबरीची नायिका काळाच्यापुढे जाणारी आहे. म्हणून बंडखोर वाटते. वस्तुत: आपण काही क्रांती करतोय किंवा बंड करतोय अशी भावना ती कुठे दाखवत नाही. तात्पर्य गौरी देशपांडे यांची स्त्रीवादी नायिका स्वाभाविकतेने येते. कादंबरीतील त्यांची स्त्री समूहमनापेक्षा व्यक्तिस्वातंत्र्याचा स्वीकार करणारी आहे. ती उच्चशिक्षित, अर्थार्जन करणारी अंतरराष्ट्रीय समाजजीवनाशी रूळणारी, अत्याधुनिकतेचा सहज स्वीकार करणारी आहे. तसेच ही स्त्री निसर्गातील एक महत्वपूर्ण घटक म्हणून स्वत:कडे व इतर स्त्रियांकडे पाहणारी आहे. स्त्रीजातीकडे दासी, गुलाम किंवा भोग वस्तू म्हणून पाहू नये अशी तिची स्वाभाविक भूमिका आहे.

या प्रकरणात गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील नायिकांच्या मनोभूमिकांचा विचार मांडलेला आहे. 'एकेक पान गळावया', 'दुस्तर हा घाट', 'मुक्काम', 'निरगाडी' , 'मध्यलटपटीत', 'आहे हे असे आहे', 'चंद्रिके ग सारिके गं' इ. कादंबरी लेखनाच्या अनुषंगाने आणि आधाराने प्रेरणा, हेतु,आशय व अभिव्यक्ती याविषयी विचार मांडले आहेत. विशेषत: गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील स्त्रीव्यक्तिरेखा, त्यांचा संघर्ष, त्यांचा जीवनाकडे व विशिष्ट घटनाप्रसंगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन याविषयी सोदाहरण स्पष्टीकरण मांडण्यात आलेले आहे. यानंतरच्या भागात आपणास 'गोफ' कादंबरीच्या अंतरंगाच्या विविध घटकांचा शोध घ्यावयाचा आहे.

## संदर्भ सूची

१) गौरी देशपांडे, 'अरेबियन नाईटस्', श्री गजानन बुक डेपो, पुणे, १९७५, खंड – १, पृ.१९०.

२) अश्विनी धोंगडे, ''गौरी देशपांडे विशेषांक'', मिळून साऱ्याजणी, २००३, ऑगस्ट, मौज प्रकाशन, पुणे, पृ. ८९.

३) प्रभा गणोरकर, ''गौरी देशपांडे विशेषांक'', मिळून साऱ्याजणी, २००३, ऑगस्ट, मौज प्रकाशन, पुणे, पृ. ७४.